# प्रेसनोट                    दिनांक १३/०८/२०१९

## गोवा येथील कमी प्रतीची विदेशी दारू वेगवेगळया कंपनीच्या दारूच्या बाटल्यांमध्ये भरून त्यास बनवाट सील लावुन विक्री करणाऱ्यास नवी मुंबई गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाकडुन अटक

---------------------------------------------------------

मा. पोलीस आयुक्त सो।, मा. पोलीस सह आयुक्त सो। नवी मुंबई यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये अवैद्य दारू साठा/विक्री करणा-यांवर विशेष मोहीम राबवुन कारवाई करणेबाबत आदेश दिलेले असुन त्याप्रमाणे मा. पोलीस उप आयुक्त, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई सुरू केली.

दिनांक १२/०८/२०१९ रोजी मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे सपोनि राजेश गज्जल यांना मिळालेल्या गोपनीय बातमीवरून नागझरी गाव, ता. पनवेल येथील काठे चाळीमधील दोन रूममध्ये गोवा येथुन ROYAL 77 SPECIAL BLEND WHISKY ही कमी प्रतीची विदेशी दारू अवैद्यरित्या आणुन ती McDowells No.1, IMPERIAL BLUE, DSP Black, SEAGRAMS, MD, SEAGRAMS इ. वेगवेगळया कंपन्यांच्या विदेशी दारूच्या रिकाम्या बाटल्यामध्ये भरून त्या बाटलीस त्या त्या कंपनीचे बनावट झाकण व सिल लावुन ती दारू महाराष्ट्र, गुजरात येथे रंजन शिवराम शेट्टी उर्फ रंजनकुमार, वय ४९ वर्षे, रा. नेवाळी, हाजीमलंग रोड, ता. अंमरनाथ जि. ठाणे हा त्याचे साथीदारामार्फत विक्री करतात. नमुद इसमांविरूद्ध तळोजा पोलीस ठाणे, नवी मुंबई गु.रजि.नं. १४२/२०१९ भादवि कलम ४२०, ४६५, ४६८, सह महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे दाखल करण्यात आला असुन अटक आरोपीच्या ताब्यातुन सुमारे ३,३०,३५०/- रू. किंमतीची ROYAL 77 SPECIAL BLEND WHISKY – FOR SALE IN GOA ONLY या प्रत्येकी ७५० मिलीच्या ३३०० बाटल्या व वेगवेगळया विदेशी दारूच्या कंपनीची प्लास्टीकची सिल करण्याची ९७०० बनावट झाकणे हस्तगत करण्यात आलेली आहेत. अटक आरोपी रंजन शेट्टी याचेविरूद्ध अशाच प्रकारचा मानपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर गु.रजि.नं. ६२७/२०१७ प्रमाणे दाखल आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी श्री. अजय कदम, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचेसह मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी.कोल्हटकर, सहा. पोलीस निरीक्षक, राजेश गज्जल, निलेश तांबे, मपोउनि, आर. टी. काळे, सफौ संजय पवार, पोह/पोपट पावरा, ज्ञानेश्वर बनकर, मपोह/अनिता पवार, पोना/सचिन धनवटे, पोना/विष्णु पवार, पोना/मिथुन भोसले, पोना/प्रकाश सांळुखे, पोशि/ मेघनाथ पाटील, पोना/सतिश चव्हाण यांनी केलेली असुन गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा, मध्यवर्ती कक्षाचे सपोनि राजेश गज्जल हे करीत आहेत.

*************